**CNR No. MHSI**01-000558-2012

# नियमित दिवाणी पुनर्वाद क्र. १४१/२०१२ मधील नि. ७१, ७२ व ७३ खालील सामाईक आदेश.

**(कृष्णा परुळेकर (मयत) तर्फे वारस विजय परुळेकर वगैरे – पुनर्वादी वि. सत्यवान मेस्त्री उर्फ हेदळकर (मयत) तर्फे वारस संगीता मेस्त्री वगैरे – उत्तरवादी)**

--------------------------

१. पुनर्वादी क्र. १अ/अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज नि. ७२ हा पुनर्वादी क्र. १क यांचे वारस अभिलेखावर घेणेकामी झालेला विलंब क्षमापित करणेकरीता, अर्ज नि. ७१ हा उपशमीतचा आदेश रद्द करणेकरीता आणि अर्ज नि. ७३ हा पुनर्वादी क्र. १क यांचे वारस अभिलेखावर घेणेकरीता परवानगी मिळणेकामी दाखल केला आहे.

२. प्रस्तुत अर्जांचे, उत्तरवादींच्या म्हणण्याचे अवलोकन केले व विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

३. अर्जदार यांचे असे कथन आहे की, पुनर्वादी क्र. १क – रविंद्र कृष्णा परुळेकर यांचा दि. ३१/०५/२०२१ रोजी मृत्यू झाला. परंतु अर्जदार हे त्यांच्या आजारावरील औषधोपचाराकरीता मुंबई येथे असल्यामुळे ते विहीत कालावधीत पुनर्वादी क्र. १क यांचे वारस अभिलेखावर आणू शकले नाहीत.

४. अभिलेखावरील मृत्यू प्रमाणपत्रावरुन पुनर्वादी क्र. १क यांचा मृत्यू दि. दि. ३१/०५/२०२१ रोजी झाल्याचे स्पष्ट होते. प्रस्तावित वारस हे पुनर्वादी क्र. १क यांचे नसल्याबाबत उत्तरवादींनी आक्षेप नोंदविलेला नाही. तसेच सदरचे अर्ज मंजूर केल्यास उभयपक्षकारांचे कोणतेही नुकसान संभवत नाही, उलटपक्षी पक्षकारांच्या परस्परविरोधी कथनांचा विचार करुन प्रकरण गुणवत्तेवर निर्णित होण्यास मदतच होणारी आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. अर्ज मंजूर करणेत येत आहेत. पुनर्वादी क्र. १क यांचे वारस अभिलेखावर घेणेकामी झालेला विलंब क्षमापित करण्यात येत आहे. उपशमीतचा आदेश रद्द करणेत येत आहे.

२. पुनर्वादी क्र. १क यांचे वारस अभिलेखावर घेण्यात यावेत.

३. पुनर्वादी क्र. १अ/अर्जदार यांनी नियमानुसार विहीत मुदतीत आवश्यक पूर्तता करावी आणि पुनर्वादपत्राची सुधारीत प्रत अभिलेखावर दाखल करावी.

सही/–

(सं. जु. भारुका)

दिनांकः– २५/०१/२०२३

प्रमुख जिल्हा न्यायाधीश,
सिंधुदुर्ग–ओरोस.

**CNR No. MHSI01-000558-2012**

# नियमित दिवाणी पुनर्वाद क्र. १४१/२०१२ मधील नि. ७४, ७५ व ७६ खालील सामाईक आदेश.

**(कृष्णा परुळेकर (मयत) तर्फे वारस विजय परुळेकर वगैरे – पुनर्वादी वि. सत्यवान मेस्त्री उर्फ हेदळकर (मयत) तर्फे वारस संगीता मेस्त्री वगैरे – उत्तरवादी)**

---------------------------

१. पुनर्वादी क्र. १अ/अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज नि. ७५ हा उत्तरवादी क्र. ९ चे वारस अभिलेखावर घेणेकामी झालेला विलंब क्षमापित करणेकरीता, अर्ज नि. ७४ हा उपशमीतचा आदेश रद्द करणेकरीता आणि अर्ज नि. ७६ हा उत्तरवादी क्र. ९ चे वारस अभिलेखावर घेणेकरीता परवानगी मिळणेकामी दाखल केला आहे.

२. प्रस्तुत अर्जांचे, उत्तरवादींनी दाखल केलेल्या म्हणण्याचे अवलोकन केले व विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

३. अर्जदार यांचे असे कथन आहे की, उत्तरवादी क्र. ९ – दिलीप भगवान परुळेकर यांचा दि. १३/०३/२०२१ रोजी मृत्यू झाला. परंतु अर्जदार हे त्यांच्या आजारावरील औषधोपचाराकरीता मुंबई येथे असल्यामुळे ते विहीत कालावधीत उत्तरवादी क्र. ९ चे वारस अभिलेखावर आणू शकले नाहीत.

४. अभिलेखावरील मृत्यू प्रमाणपत्रावरुन उत्तरवादी क्र. ९ यांचा मृत्यू दि. १३/०३/२०२१ रोजी झाल्याचे स्पष्ट होते. प्रस्तावित वारस हे उत्तरवादी क्र. ९ चे नसल्याबाबत उत्तरवादींनी आक्षेप नोंदविलेला नाही. तसेच सदरचे अर्ज मंजूर केल्यास उभयपक्षकारांचे कोणतेही नुकसान संभवत नाही, उलटपक्षी पक्षकारांच्या परस्परविरोधी कथनांचा विचार करुन प्रकरण गुणवत्तेवर निर्णित होण्यास मदतच होणारी आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. अर्ज मंजूर करणेत येत आहेत. उत्तरवादी क्र. ९ चे वारस अभिलेखावर घेणेकामी झालेला विलंब क्षमापित करण्यात येत आहे. उपशमीतचा आदेश रद्द करणेत येत आहे.

२. उत्तरवादी क्र. ९ चे वारस अभिलेखावर घेण्यात यावेत.

३.	पुनर्वादी क्र. १अ/अर्जदार यांनी नियमानुसार विहीत मुदतीत आवश्यक पूर्तता करावी आणि पुनर्वादपत्राची सुधारीत प्रत अभिलेखावर दाखल करावी.

सही/-

(सं. जु. भारुका)

दिनांकः- २५/०१/२०२३

प्रमुख जिल्हा न्यायाधीश,

सिंधुदुर्ग-ओरोस.